आवाजात चालू केली. मग बेडरुमच दार बंद करून घेऊन ती बाथरूम मध्ये वॉश घ्यायला गेली. कढत कढत पाण्यानी तिचा दिवसभराचा सगळा शीण तिनं जणूकाही त्या पाण्यात वाहवून टाकला. आणि मग ताजीतवानी होत ती बेडजवळ आली. लॅपटॉप ऑन करीत तिनं सकाळी करायचं प्रेझेंटेशन पुन्हा एकदा तपासून पाहिलं. एक दोन किरकोळ चुका दुरुस्त करीत तिनं पुन्हा एकदा स्वतःची खात्री करुन घेतली आणि मग ती बेडवर शांतपणे आडवी झाली. हातातल्या रिमोटनी सीडीचा आवाज कमी करीत तिनं फोनचं ॲन्सरिंग मशिन चालू केलं. बरेचसे ब्लँक कॅ◌ाल्स आणि दोन तीन किरकोळ निरोपानंतर तिला अचानक एक वेगळाच आवाज ऐकू आला. खूप ओळखीचा, पण खूप वर्षांनी ऐकायला आलेला . एकदम उठून मशीन पुन्हा एकदा सेट करून ती सावरून बसली. आणि तोच आवाज पुन्हा एकदा ऐकायला यायला ल
◌ागला.

“ उत्तरा , रात्रीचे बारा वाजून गेले आहेत. म्हणजे खऱ्या अर्थानी नवा दिवस चालू होतोय. आज म्हणजे खरं तर कालच्या बिझिनेस न्यूजमध्ये तुझा फोटो आणि मुलाखत वाचली. आणि मग तुझेच विचार मनात आले. आणि सहज आठवलं, आज आषाढातला पहिला दिवस. सो ? अ वेरी हॅपी बर्थ डे टू यू ! म्हणजे अर्थात तिथीनं! बाय द वे, आवाज ओळखलास ? उदय. बाय !. उत्तरांनी ॲन्सरिंग मशीन बंद केलं. यमनातल्या समेवर येताना डग्गा घुमला आणि उत्तरा स्वतःच्याच विचारात गढून गेली.

अनपेक्षितपणे आलेला उदयचा फोन तिला तिच्या इन्स्टिट्यूटच्या दिवसांकडे घेवून गेला. तो सपाटून केलेला अभ्यास . हॉस्टेलचे दिवस. कट्ट्यावर तासनतास घातलेले वाद. ती मॉक प्रेजेंटेशनस् , ते रोल प्लेज , प्रोजेक्ट्स.... इन्स्टिट्यूटचं वातावरणच असं काही भारलेलं ह